पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मा. फ प्रभाग समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ०२

सभावृत्तांत

दिनांक :– १३/०६/२०१९

वेळ :- स.११.३०

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची दिनांक ०३/०६/२०१९ ची तहकूब मासिक सभा गुरुवार दिनांक १३/०६/२०१९ रोजी स. ११.३० वा. फ प्रभाग कार्यालयाचे राजर्षी शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सभापती |
| २. | मा.कुंदन अंबादास चव्हाण | सदस्य |
| ३. | मा.संजय बबन नेवाळे | सदस्य |
| ४. | मा. भालेकर प्रविण महादेव | सदस्य |
| ५. | मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे | सदस्य |
| ६. | मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्य |
| ७. | मा.घोलप कमल अनिल | सदस्य |
| ८. | मा. उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| ९. | मा. पवळे सुमनताई मधुकर | सदस्य |
| १०. | मा. दिनेश लालचंद यादव | नामनिर्देशित सदस्य |
| ११. | मा. संतोष भाऊसाहेब मोरे | नामनिर्देशित सदस्य |
| १२. | मा. पांडुरंग गुलाब भालेकर | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.मनोज लोणकर-क्षेत्रिय अधिकारी, मा. प्रभावती गाडेकर - प्रशासन अधिकारी, मा. प्रविण घोडे - कार्यकारी अभियंता (वि.), मा. श्रीकांत सवणे -कार्यकारी अभियंता (स्था), मा.प्रवीण लडकत-कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) मा.खोंद्रे मोहन ईश्वरा- उपअभियंता (झोनिपु स्था.), मा. सतिश वाघमारे- उपअभियंता (स्था), मा. अशोक अडसुळे - उपअभियंता (वि.), मा. हनुमंत शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), मा. शहाजी गायकवाड-उपअभियंता (स्था.), श्री महाजन-उपअभियंता(ज.नि.),मा. शेखर चंद्रकांत गुरव - कनिष्ठ अभियंता ( न.रचना), मा. जोशी अतुल - कनिष्ठ अभियंता (पा.पु.), मा. शेख एस. के. - कनिष्ठ अभियंता ( झोनिपू), मा. जाधव एस. एस. - कनिष्ठ अभियंता (पा.पु.), मा. जी. जी. कांबळे – उद्यान सहाय्यक, मा. धाकोजी शिर्के सहा. आरोग्याधिकारी, मा. मोहन निकम (लेखाधिकारी), श्री शेख शोएब,क.अभियंता(झोनिपु) मा. गिरीश सलगरकर – मुख्य लिपीक, श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक, श्री सुरेश घोडे-उदयान निरिक्षक हे उपस्थित होते.

सभापती मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

Scanned by CamScanner

अ) कार्यक्रम पत्रिका क्रमांक १४ सोमवार दिनांक ०५/०३/२०१९ रोजी झालेल्या सभेच्या सभावृत्तांत कामय करणेत येत आहे असे मा. सभापती यांनी प्रकट केले.

आ) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०१ गुरुवार दिनांक ०९/०५/२०१९ रोजी झालेल्या सभेच्या सभावृत्तांत कामय करणेत येत आहे असे मा. सभापती यांनी प्रकट केले.

मा.सभापती व उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक - ३. मा.योगिता नागरगोजे , सभापती यांचा दिनांक १३/०६/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

फ प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या गुरुवारी सकाळी ११.३० वाजता घेणेत मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळेसचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

विषय क्र - १
दिनांक - १३/०६/२०१९
सुचक- मा.योगिता नागरगोजे

ठराव क्र. - २
विभाग – प्रशासन
अनुमोदक- मा.सुमन पवळे

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, यांचेकडील पत्र क्रमांक- फक्षेका/२/कावि/३६०/२०१८ दिनांक - ०३/११/२०१८.

फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात हॉकर्स झोनचे निश्चित केलेल्या ठिकाणास नेमणेत आलेल्या उपसमिती मार्फत प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन हॉकर्स ठिकाणे निश्चित करणेत आलेली आहेत. सदर ठिकाणांना मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेत येऊन सदरचा विषय शहर फेरीवाला समितीकडे अंतिम मान्यते कामी सादर करावयाचा असल्याने मान्यता देणेबाबत चर्चा झाली असता सर्व संबंधित अधिकारी यांनी प्रभाग समिती सदस्यांसमवेत दिनांक १९/०६/२०१९ रोजी प्र.क्र.१२ , १३ व दिनांक २१/०६/२०१९ रोजी प्र.क्र.१ ,११ ची पाहणी करणेत येऊन हा विषय पुढील होणा-या मासिक सभेपर्यंत तहकूब करणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सदर विषय पुढील मासिक सभेपर्यंत सर्वांनुमते तहकुब करणेत आला असे.

---

विषय क्र - २
दिनांक -१३/०६/२०१९
सुचक- मा.योगिता नागरगोजे

ठराव क्र. - ३
विभाग – सदस्य प्रस्ताव
अनुमोदक- मा.संजय नेवाळे

संदर्भ – १.मा. योगिता नागरगोजे, सदस्य यांचा दिनांक ०४/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव
२ मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्र. 19 दि. 04/12/2018.

फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 11 मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार)– १) लोकनेते गोपीनाथ मुंडे नगर २)समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली, भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती यांनी दि. 01/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

Scanned by CamScanner

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण – मोरवाडी, अखिल भगवान महासंघ - पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी, पिंपळे गुरव या यांनी दि. 16/01/2019 व 21/01/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंडे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही संस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणाबाबत सांगोपांग चर्चा होऊन सदरचा विषय पुढील होणाऱ्या मासिक सभेपर्यंत तहकूब करणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सदर विषय पुढील मासिक सभेपर्यंत सर्वानुमते तहकुब करणेत आला असे.

---

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

विषय क्र - ३ ठराव क्र. - ४

दिनांक - १३/०६/२०१९ विभाग – सदस्य प्रस्ताव

सुचक- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक- मा. कमल घोलप

संदर्भ - मा. सभापती योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांचा दि.१३/०६/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

फ प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या गुरुवारी सकाळी ११.३० वाजता घेणेत मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(योगिता नागरगोजे)
सभापती
फ प्रभाग समिती,निगडी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/ १७/२०१९ दिनांक. १५/०६/२०१९

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव ( सभाशाखा )
फ प्रभाग समिती
निगडी,

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned by CamScanner